ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत.

(श्री. बालाजी भिमराव दहिवडे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लव्हाळी ओतूर ता.अकोले)

जिल्हा परिषद अहिल्यानगर

सामान्य प्रशासन विभाग-२

जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ ९६८ /२०२५

अहिल्यानगर, दिनांक -१६/०९/२०२५

संदर्भ :- १.या कार्यालयाकडील सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३८१/२०२३, दिनांक- २४.०५.२०२३

२.या कार्यालयाकडील दोषारोप क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३८२/२०२३, दिनांक- २४.०५.२०२३

३.गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१४०४/२०२३, दि.१०.०७.२०२३ नुसार श्री बी बी दहिवडे यांचा खुलासा.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (३)(१)

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (३)(५)

६. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौर/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५

७. सेवा निलंबन आढावा समिती मधील सूचना दि.०७.०७.२०२५.

ज्याअर्थी संदर्भ क्र.१ नुसार श्री.बालाजी भिमराव दहिवडे,तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लव्हाळी ओतूर ता.अकोले येथे कार्यालयीन कामी गैरहजर राहणे,नोटीसचा खुलासा सादर न करणे घरपटटी पाणीपटटी वसुल केलेली रक्कम बॅकेत भरणा न करता स्वत:चे वैयक्तिक कामासाठी खर्च करणे, अशा प्रकारचे गैरवर्तन केल्याने त्यांना सेवा निलंबित करणेत आले होते.

संदर्भ क्र.२ अन्वये श्री.बालाजी भिमराव दहिवडे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लव्हाळी ओतूर ता.अकोले यांचेविरुध्द दोषारोपाचे ज्ञापन बजावण्यात आलेली होते. संदर्भ क्र.३ अन्वये श्री.बालाजी भिमराव दहिवडे यांनी दोषारोप पत्रातील तीन आरोप मान्य व कबुल केलेले आहे.

सबब,संदर्भ क्र.७ मधील चर्चेनुसार व संदर्भ क्र.६ नुसार श्री.बालाजी भिमराव दहिवडे,यांचा निलंबन कालावधी हा तीन महिन्यांपेक्षा अधिक झालेला असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर याव्दारे, श्री. बालाजी भिमराव दहिवडे, सेवा निलंबित ग्रामपंचायत अधिकारी, यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर पंचायत समिती ---राहुरी------ येथे पुन:स्थापित करीत आहे. सदरची पुन:स्थापना ही दोषारोपांचा खुलासा मान्य केल्याने पुढील गैरवर्तनाबाबतची शिस्त भंगविषयक कारवाईचे अधिन राहून करणेत येत आहे.

आणखी असाही आदेश देत आहे की, श्री.बालाजी भिमराव दहिवडे, सेवा निलंबित तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांचे निलंबन कालावधीचा निर्णय शिस्तभंग कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.या

आदेशाची नोंद श्री. बालाजी भिमराव दहिवडे, सेवा निलंबित ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९१६०६०९९५ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-09-2025 19:13:53
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. बालाजी भिमराव दहिवडे, सेवा निलंबित तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी,

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती राहुरी

२/- श्री. बालाजी भिमराव दहिवडे, ग्रामपंचायत अधिकारी हे ग्रामपंचायत अधिकारी या पदावर सेवेत रुजू झालेनंतर रुजू अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- सामान्य प्रशासन विभाग-२, ग्रामपंचायत आस्थापना-१, जि.प.अहिल्यानगर.